दाखल तारीख २३/०२/२०२६
नोंदणी तारीख २३/०२/२०२६
निकाल तारीख १९/०६/२०२६
कालावधी- ००वर्षे ०३महिने २७दिवस

**अहमदनगर येथील न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर ता. जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.**

**(म.प्र.जसवंत-न्यायाधीश यांचे समोर)**

**लवाद दावा क्रमांक १०/२०२६**

रावसाहेब देशमुख नागरी सहकारी
पतसस्था मर्यादीत, राशिन ता. कर्जत
जिल्हा-अहमदनगर तर्फे व करीता
अधिकृत प्रतिनिधी श्री. शुभम अनिल साके
वय-२६ वर्षे धंदा-नोकरी
रा. राशिन ता कर्जत जि. अहमदनगर **वादी**

**विरूद्ध**

भानुदास रामचंद्र काळे (मयत) वारस
१अ.श्रीमती कमलाबाई भानुदास काळे
वय-सज्ञान, धंदा-घरकाम व शेती

१ब.श्री राजेंद्र भानुदास काळे
वय-सज्ञान, धंदा-शेती व व्यवसाय

१क.श्री पदमाकर भानुदास काळे
वय-सज्ञान, धंदा-शेती व व्यवसाय

१ ड श्री विजय भानुदास काळे
वय सज्ञान धंदा-शेती व व्यवसाय
नंबर १अ ते १ड सर्व रा. शिंपोरा पो. खेड,
ता कर्जत जि अहमदनगर

१ इ. सौ साधना तात्यासाहेब चव्हाण
वय-सज्ञान,धंदा घरकाम व शेती
रा. मुरुम ता. बारामती जि पुणे

२.श्री निवृत्ती विठ्ठल कानगुडे
वय–सज्ञान, धंदा शेती

३. श्री बाबासाहेब सोमनाथ शेटे
वय सज्ञान धंदा–शेती
नंबर २ व ३ रा शिंपोरा,
पो. खेड ता कर्जत जि. अहमदनगर **प्रतिवादी**

**दावा रक्कम रूपये २०,६४,९३६/– वसुलीकरीता**

वादीकरीता : ॲड श्री. एल. बी.कचरे
प्रतिवादी १अ ते १ इ, २, ३ करीता : विना कैफियत

**न्यायनिर्णय**
(पारीत दि.१९/०६/२०२६)

वादी संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत नोंदणीकृत संस्था असून प्रतिवादी हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी १ यांना किराणा व्यवसायासाठी कर्जाची जरुरी असल्याने संस्थेकडे कर्ज मागणीचा अर्ज केला. सदर मागणी अन्वये वादी संस्थेने प्रतिवादी यांना रक्कम रु.१५,००,०००/– इतके कर्ज दि. ११/०१/२०२३ रोजी अदा केले.

२) प्रतिवादीने वादी संस्थेच्या हक्कात कर्जरोखा, जामीनरोखा, जॉईन्ट ॲण्ड सेव्हरल प्रॉमिसरी नोट ही कागदपत्रे करुन दिली. प्रतिवादीने सदरचे कर्ज द.सा.द.शे.१२% दराने परतफेड करण्याचे मान्य केले आणि कर्ज थकीत गेल्यास २% दंड व्याज आकारण्याचे हक्क वादीला दिले.

३) प्रतिवादीने मान्य केलेप्रमाणे कर्जाची परतफेड केली नाही म्हणून प्रतिवादीकडे दि. ३०/०९/२०२५ अखेर रक्कम रु २०,६३,४३६/–इतकी बाकी आहे. सदरची रक्कम प्रतिवादीने भरली नसल्याने प्रतिवादी हे वैयक्तिक व सामुदायिकरित्या कर्जपरतफेड करण्यास जबाबदार आहे.

४) प्रतिवादी यांनी विहित मुदतीत कैफियत दिली नसल्याने त्यांच्याविरुद्ध दावा विना कैफियत चालला.

५) वादीच्या कथनावरुन खालील मुद्दे उपस्थित होतात आणि माझा निष्कर्ष कारणमिमांसासह खालील प्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी हे व्यक्तीगत व सामुदायिकरीत्या रक्कम रु २०,६३,९३६/–द.सा.द.शे.१२% व त्यावर दंडव्याज २% दि. ०१/१०/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत जबाबदार असल्याचे वादी संस्था सिध्द करते काय ? | होय |
| २ | आदेश व हुकुमनामा काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ करिता:–**

६) वादीच्या कथनाप्रमाणे संस्थेने प्रतिवादी १ यास किराणा व्यवसायासाठी कर्ज रक्कम रु.१५,००,०००/– कर्ज वाटप केले. प्रतिवादी यांनी करारानुसार कर्जाची परतफेड केली नाही. वादी संस्थेने दाव्यातील कथने सिध्द करणेकरिता संस्थेतर्फे साक्षीदार म्हणून श्री.शुभम अनिल साके यांचे प्रतिज्ञापत्र नि. २३ कडे दाखल केले. सदर साक्षीदाराने शपथपत्रात नमूद केले कि वादी संस्थेने प्रतिवादी १ यांना रक्कम रु. १५,००,०००/– कर्ज वाटप केले.

७) वादी संस्थेने तोंडी पुराव्याशिवाय नोटीस नि.३५, कर्ज मागणी अर्ज नि. २४, कर्जरोखा नि.२५, वचनचिठ्ठी नि.२६ तसेच खातेउतारा नि.३३ कडे दाखल केला आहे. सदर कागदत्रांवरून वादी संस्थेने प्रतिवादी यास रक्कम रु.१५,००,०००/– इतके कर्जाची वाटप केल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी २ व ३ हे सदर कर्जास जामीनदार असल्याचे दिसून येते. प्रस्तुतचा दाव्यास प्रतिवादीने आव्हाण दिलेले नाही.

८) वादी संस्थेचे कथन आहे कि प्रतीवादीकडे रक्कम रु. २०,६४,४३६/– इतकी बाकी आहे. दाव्यातील रक्कम सिध्द करणे करिता वादी संस्थेने नि.३३ कडे खाते उतारा दाखल केला. सदरील खाते उताऱ्याचे अवलोकन करता प्रतिवादीकडे दि. ३०/०९/२०२५ अखेर रक्कम रु.२०,६३,४३७/– बाकी असल्याचे दिसून

येते. वादी संस्थेने कर्जबाकी रकमेवर द.सा.द.शे.१४% व्याजदराची मागणी केली आहे. वादी संस्थेने दाखल केलेला कर्जरोखा नि.२५ चे अवलोकन करता असे दिसून येते की, प्रतिवादीने सदरचे कर्ज द.सा.द.शे.१२% दराने परतफेड करण्याचे मान्य केले. तसेच सदरचे कर्ज थकीत गेल्यास २% दंड व्याज आकारण्याचे हक्क वादीला दिल्याचे दिसुन येते. सबब, वादी संस्था ही प्रतिवादीकडून १४% व्याज मिळण्यास हक्कदार आहे. वादी संस्थेने प्रस्तुतचा दावा हा सिध्द केला आहे. उपरोक्त आलेल्या पुराव्यावरुन व सर्व कारणांचा व बाबींचा विचार करुन मी मुद्दा क्र.१ करीता वरीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीताः–**

९) वर चर्चा केल्यावरुन वादी संस्थेने प्रस्तुतचा दावा सिध्द केला आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ करीता मी वरीलप्रमाणे उत्तर देवून, मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी २०,६३,४३६/– द.सा.द.शे. १४% व्याजासह दि. ०१/१०/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत वादीस द्यावे.

३. येणेप्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)

सही
(म. प्र. जसवंत)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.

दि. १९/०६/२०२६

**अहमदनगर येथील न्यायाधीश सहकार न्यायालय, अहमदनगर ता. जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.**

**(म.प्र.जसवंत–न्यायाधीश यांचे समोर)**

**लवाद दावा क्रमांक १०/२०२६**

रावसाहेब देशमुख नागरी सहकारी
पतसस्था मर्यादीत, राशिन ता. कर्जत
जिल्हा–अहमदनगर तर्फे व करीता
अधिकृत प्रतिनिधी श्री. शुभम अनिल साके
वय–२६ वर्षे धंदा–नोकरी
रा. राशिन ता कर्जत जि. अहमदनगर **वादी**

**विरूद्ध**

भानुदास रामचंद्र काळे (मयत) वारस
१अ.श्रीमती कमलाबाई भानुदास काळे
वय–सज्ञान, धंदा–घरकाम व शेती

१ब.श्री राजेंद्र भानुदास काळे
वय–सज्ञान, धंदा–शेती व व्यवसाय

१क.श्री पदमाकर भानुदास काळे
वय–सज्ञान, धंदा–शेती व व्यवसाय

१ ड श्री विजय भानुदास काळे
वय सज्ञान धंदा–शेती व व्यवसाय
नंबर १अ ते १ड सर्व रा. शिंपोरा पो. खेड,
ता कर्जत जि अहमदनगर

१ इ. सौ साधना तात्यासाहेब चव्हाण
वय–सज्ञान,धंदा घरकाम व शेती
रा. मुरुम ता. बारामती जि पुणे

२.श्री निवृत्ती विठ्ठल कानगुडे
वय–सज्ञान, धंदा शेती

३. श्री बाबासाहेब सोमनाथ शेटे
वय सज्ञान धंदा–शेती
नंबर २ व ३ रा शिंपोरा,
पो. खेड ता कर्जत जि. अहमदनगर **प्रतिवादी**

**दावा रक्कम रूपये २०,६४,९३६/– वसुलीकरीता**

वादीकरीता : ॲड श्री. एल. बी.कचरे
प्रतिवादी १अ ते १ इ, २, ३ करीता : विना कैफियत

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९१ अन्वये वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वरील दाव्याचे कारण झाल्यावरुन मी वरील पक्षकारांना समन्स बजावुन दाव्याची योग्य ती कायदेशीर चौकशी करुन व माझे पुढे आलेल्या पुराव्या वरुन दिलेल्या निकालपत्रास अनुसरुन खालीलप्रमाणे निवाडा देत आहे.

**निवाडा**

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी २०,६३,४३६/– द.सा.द.शे. १४% व्याजासह दि. ०१/१०/२०२५ पासून ते पूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत वादीस द्यावे.

३. कोर्ट फी स्टॅम्प खर्च रक्कम रु. २६,१५०/–

सही
(म. प्र. जसवंत)
न्यायाधीश,
सहकार न्यायालय, अहमदनगर.

दि. १९/०६/२०२६